# मेट्रो-३ प्रकल्पाचे ९३ टक्के भुयारीकरण पूर्ण



**मुंबई** : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ स्थानक हा १.५ किमी लांबीच्या भुयाराचा टप्पा शुक्रवारी पूर्ण करण्यात आला. हा ३६ वा टप्पा असून संपूर्ण मेट्रो-३ मार्गिकेचे ९२ टक्के भुयारीकरण पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेची लांबी ३३.५ किमी असून सात पॅकेजमध्ये या मार्गिकेचे काम विभागण्यात आले आहे. शुक्रवारी पूर्ण करण्यात आलेला ३६ वा टप्पा हा पॅकेज ६ मधील शेवटचा असून पॅकेज ६ चे १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाल्याचे एमएमआरसीएल अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या ब्रेकथ्रू वेळेस कोची मेट्रो रेलचे व्यवस्थापकीय संचालक अल्केश शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ स्थानक १.५ किमी इतके लांब असून तापी १ आणि तापी २ या दोन टनेल बोअरिंग मशिन्सच्या मदतीने ४.४ किमीचे भुयारीकरण पूर्ण केले आहे.

पॅकेज ६ अंतर्गत दोन स्थानके आंतरदेशीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनलवर आहेत. या दोन्ही स्थानकांना एअरपोर्ट टर्मिनलशी जोडले जाईल. त्यामुळे विमानतळापर्यंत प्रवास करणे प्रवाशांना सुलभ होणार असल्याचा विश्वास एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजीतसिंह देओल यांनी व्यक्त केला. हार्ड रॉक तंत्रज्ञानाने सुसज्ज टेराटॅक निर्मित टीबीएम तापी १ आणि २ द्वारे १५ महिन्यांत भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. आंतरदेशीय विमानतळ स्थानकाचे जवळपास ७६.४ टक्के बांधकाम पूर्ण झाले असल्याचे एमएमआरसीएलचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी स्पष्ट केले आहे. पॅकेज ६ अंतर्गत आंतरदेशीय विमानतळ टी १, आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ आणि सहार रोड मेट्रो स्थानकांचा समावेश असून या पॅकेजमध्ये ४ भुयारीकरणाचे टप्पे पार करण्यात आले आहेत.

### *भुयारीकरणाचे ४ टप्पे*

*आंतरराष्ट्रीय विमानतळ ते सहार रोड-अपलाईन ६८७ मीटर आणि डाऊनलाईन ६९२ मीटर सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ-अपलाईन १५१५ मीटर आणि डाऊ नलाईन १५१२ मीटर*